RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू

# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१२ गुरुवार
फेब्रुवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २५८
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!
धमाका ऑफर
३ दिवस मोफत!
तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी?
मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!
१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!
कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.
अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

## बांधकाम नकाशा हाच NA

**▸विदर्भ केसरी।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे. त्यानुसार, आता शेतकऱ्यांना बिगर कृषी (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची कोणतीही गरज नाही.आता बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए मानले जाणार आहे. सरकाच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जमीन महसूल कायद्यात बदल केला आहे. या बदलानुसार, आता अकृषक कर आकारला जाण्याची सुविधा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सनद घेण्याची गरजही संपुष्टात आली आहे. बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए परवानगी मानली जाईल. यामुळे जमीन रुपांतर प्रक्रिया अधिक जलद, सोपी व पारदर्शक होईल. उल्लेखनीय बाब म्हणजे आतापर्यंत अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. यासाठी विविध दस्तऐवज गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. पण महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांचे काम अधिक सुलभ व सोपे होणार आहे. ही कार्यपद्धती राजपत्रातही प्रकाशित करण्यात आली आहे.

## वाहतूक पोलिसांच्या दक्षतेने व्यक्तीला जीवदान

**▸विदर्भ केसरी। हिंगोली**

शहरातील महात्मा गांधी चौकात बेशुध्द अवस्थेत पडलेल्या एका अनोळखी इसमास वाहतूक पोलिसांच्या दक्षतेने वेळीच औषधोपचारासाठी दाखल केल्याने त्यांना जीवदान मिळाले आहे. बुधवारी ता. ११ दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. याबाबत माहिती अशी की, हिंगोली शहरातील वाहतूक व्यवस्थेला वळण लावण्यासाठी वाहतूक शाखेच्या वतीने शहरात ठिकठिकाणी गस्त घातली जात आहे. त्यासाठी पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुक शाखेचे निरीक्षक शरद मरे यांनी बंदोबस्ताचे व गस्तीचे नियोजन केले आहे. त्यानुसार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई केली जात आहे.

# सरकारने भारत मातेला विकले

## सीतारामन यांचे उत्तर- काँग्रेसने भारताला विकले, शेतकऱ्यांच्या हक्कांचा सौदा केला

**▸विदर्भ केसरी।**

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी अर्थसंकल्पावर बोलताना सांगितले की, सरकारने भारत-अमेरिका व्यापार कराराद्वारे भारत मातेला विकले आहे. ही पूर्णपणे शरणागती आहे. आता अमेरिका ठरवेल की आपण कोणाकडून तेल खरेदी करणार. आपला निर्णय पंतप्रधान करणार नाहीत.

राहुल यांच्या आरोपांना उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या- काँग्रेसवाले म्हणतात की मोदींनी शरणागती पत्करली. मी सांगते की भारताला कोणी विकले. काँग्रेसने विकले. बालीमध्ये जाऊन करार करून आले होते. व्यापार सुलभतेवर (Trade Facilitation) स्वाक्षरी करून आले होते. भारताच्या फायद्यासाठी त्यात काहीही नव्हते.



त्या म्हणाल्या की, शेतकऱ्यांच्या हक्कांवर तडजोड करणारी काँग्रेस आहे. मोदींनी 2014 मध्ये WTO मध्ये जाऊन यात सुधारणा केली. हे गरिबांना रेशन देऊ शकत नव्हते आणि हे मोदीजींवर आरोप करत आहेत.



अर्थमंत्री टीएमसी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या जीएसटीवरील आरोपांवर म्हणाल्या- अभिषेक म्हणाले की जन्मापासून मृत्यूपर्यंत लोक जीएसटी देत आहेत. ते या गोष्टी कुठून आणत आहेत? दुधावर कधी जीएसटी लागला, शिक्षणावर कधी लागला? मागे बसलेले केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह म्हणाले की तिथे 'कट मनी' लागतो, हे सीतारामन यांनीही दुजोरा दिला. सीतारामन म्हणाल्या- तुम्ही बंगालमध्ये राज्य जीएसटी (State GST) हटवू शकता, पण असे का करत नाही?

पैसेही हवे आहेत आणि बदनामीही करत आहात. तुम्ही जर बंगालमधील लोकांवरील भार कमी करू इच्छित असाल, तर तिथे पेट्रोलचे दर दिल्लीपेक्षा 10 रुपये जास्त आहेत, ते कमी करा.

### राहुल गांधी म्हणाले- अदानींवरील खटला मोदींवर दबाव आणण्यासाठी

- यापूर्वी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान एपस्टीन फाइल्स आणि अदानीवर अमेरिकेत सुरू असलेल्या खटल्याचा उल्लेख केला. ते म्हणाले की, अदानीवर सुरू असलेला खटला, खरं तर मोदींवर दबाव आणण्याचा एक मार्ग आहे.
- केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल यांना थांबवत म्हटले- तुम्ही जे काही बोललात ते सिद्ध करा. यावर काँग्रेस नेत्याने उत्तर दिले- आता देतो. लगेच सर्व पुरावे देतो.
- मात्र, अध्यक्षांनी राहुल यांना थांबवले. तर, किरेन रिजिजू यांनी नंतर सांगितले की, आम्ही राहुल गांधींविरोधात संसदेत विशेषाधिकाराची नोटीस सादर करू.

## वीज कंपनीच्या सहव्यवस्थापकीय संचालकांचा इशारा

**▸विदर्भ केसरी।**

मराठवाड्यात इयत्ता बारावीच्या परीक्षांना सुरुवात झाली असून काही दिवसांतच इयत्ता दहावीच्या परीक्षांना सुरवात होणार आहे. या परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावरील वीज पुरवठा खंडीत होऊ नये याची दक्षता घ्यावी. वीज पुरवठा खंडीत झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्याचा इशारा वीज कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने यांनी दिला आहे.


राज्यात इयत्ता बारावीच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. त्यानुसार मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळात ४४९ केंद्रावर ७७६६ वर्ग खोल्यांमध्ये १.९१ लाख विद्यार्थी परीक्षा देत आहेत. तर लातुर विभागीय मंडळात २५३ परीक्षा केंद्रावर ३९६० वर्ग खोल्यांमधून ९६ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

# बारावीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट!

**▸विदर्भ केसरी।**

राज्यात 10 फेब्रुवारीपासून बारावीच्या बोर्ड परीक्षांना सुरुवात झाली असली तरी, पहिल्याच दिवशी 'कॉपीमुक्त' अभियानाचा फज्जा उडाल्याचे समोर आले आहे. काही परीक्षा केंद्रांवर खुद्द अधिकारी आणि पर्यवेक्षकच विद्यार्थ्यांना चक्क कॉपी पुरवत असल्याचा धक्कादायक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी संबंधित परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याचे तसेच दोषी पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

बारावीच्या परीक्षा केंद्रांना सीसीटीव्ही आणि इतर मूलभूत सुविधांचे कडक निर्देश देऊनही कॉपीचे प्रकार उघडकीस आल्याने शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी कठोर कारवाईचा पवित्रा घेतला आहे. ज्या केंद्रांवर असे गैरप्रकार घडले आहेत, त्यांची मान्यता तातडीने रद्द करण्यात येणार असून भविष्यात त्यांना परीक्षा केंद्र म्हणून पुन्हा परवानगी देण्यात येणार नाही. केवळ कॉपी बहाद्दर विद्यार्थ्यांवरच नाही, तर या प्रक्रियेत सामील असलेले केंद्र प्रमुख आणि संबंधित पालकांवरही कायदेशीर बडगा उगारला जाणार असून, नियमावलीचे पालन न करणाऱ्या शाळांनाही या कारवाईतून सुटता येणार नाही, असे दादा भुसे यांनी स्पष्टपणे बजावले आहे.



राज्यात सध्या बारावीच्या परीक्षा सुरू असून मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली 'कॉपीमुक्त परीक्षा अभियान' प्रभावीपणे राबवण्यासाठी शिक्षण विभाग सज्ज झाला आहे. या मोहिमेत महसूल, गृह आणि ग्रामविकास विभागाचे सक्रिय सहकार्य घेतले जात असून, शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही दडपणाशिवाय निर्भीडपणे परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले आहे. या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी नियमित आढावा बैठका घेतल्या जात असल्या तरी, ज्या केंद्रांवर कॉपीचे गैरप्रकार समोर येतील, तिथे कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही भुसे यांनी दिला आहे.

- **जैतापूर (ता. कन्नड) येथील राष्ट्रीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या इंग्रजी पेपरमध्ये सामूहिक कॉपी केल्याप्रकरणी शिक्षण विभागाने 19 जणांना निलंबित केले आहे. त्यात झेडपीचे 3 शिक्षक, 2 केंद्रसंचालकासह 17 पर्यवेक्षकांसह बैठ्या पथकाचाही समावेश आहे.**

# बीडमध्ये पोलीस भरतीदरम्यान तरुणाचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर:**

बीड येथे सुरू असलेल्या पोलीस भरतीच्या प्रक्रियेमध्ये एका तरुणाचा बुधवारी दुपारी मृत्यू झाला. दीपक वाव्हुळ, असे मृत तरुणाचे नाव असून, तो परळी येथील रहिवासी असल्याची माहिती बीड पोलीस अधीक्षक कार्यालयातील सूत्रांकडून मिळाली. दीपक परळीहून पोलीस भरतीसाठी बीड येथे सकाळी दाखल झाला.

कवायत, धावणे आदी प्रकारानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. डीहायड्रेशनचा त्रास होत असल्याचे तपासणीदरम्यान सांगण्यात आले. मात्र त्यानंतर काही वेळातच दीपकचा मृत्यू झाल्याचे समोर आले.पोलीस यंत्रणेने तातडीने दीपकला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. दीपकचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हृदयविकाराचा तीव्र धक्का त्याला बसला की अन्य काही कारण आहे, याची स्पष्टता शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर होईल, असे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. मृत दीपक वाहुळ हा परळीजवळच्या मांडेखेल गावचा रहिवासी आहे. त्याचे आई-वडील ऊसतोड कामगार आहेत. त्याला आणखी एक दुसरा लहान भाऊ असून, तो ऑटोरिक्षा चालवतो. घरातील हालाखीच्या परिस्थितीमुळे दीपक काही दिवस पुण्याला काम करण्यासाठी गेला होता. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून दीपकने गावाकडे येऊन पोलीस भरतीची तयारी केली होती, अशी माहिती काही निकटवर्तीयांकडून मिळाली. दीपकच्या मृत्यूवर बीड पोलीस मुख्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार दीपकने दुपारी १२.५५ च्या सुमारास मैदानावरील १६०० मीटर धावण्याचे अंतर पूर्ण केले होते. मैदानावर लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये सर्व घटनाक्रम नोंद झाला आहे.

# उपचाराच्या नावाखाली नवजात बालिकेला डॉक्टरने अडीच लाखात विकले

**▸विदर्भ केसरी। भंडारा:**

स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने १० दिवसाच्या नवजात बालिकेला उपचारासाठी नागपूरला पाठवतो सांगून तिची तिऱ्हाईत व्यक्तीला अडीच लाख रुपयात विक्री करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा सूत्रधार गोंदिया येथील एक डॉक्टर असून त्याच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात आतापर्यंत केवळ एकाच व्यक्तीला अटक झाली आहे. मुख्य सूत्रधार असलेला डॉ. नितेश बाजपेयी फरार असल्याचे असून पोलीस शोध घेत आहेत.

एखाद्या चित्रपटात किंवा मोठाल्या शहरांमध्ये अनुभवास येणारा मुलांच्या विक्रीचा प्रकार जिल्ह्यात उघडकीस आल्याने नक्कीच ही बाब गंभीर आहे. त्यातही एक डॉक्टर याचा मुख्य सूत्रधार असणे वैद्यकीय क्षेत्राचे उरले सुरले पावित्र्य वेशीस टांगणारे आहे.मोहाडी तालुक्यातील पांढराबोडी येथील मालती प्रकाश वाघमारे या महिलेच्या घरी दहा दिवसाची नवजात बालिका असल्याची २ फेब्रुवारी रोजी महिला व बालकल्याण विकास विभागाच्या चाइल्ड हेल्पलाइन वर अज्ञात व्यक्तीने दिली. हेल्पलाइन समन्वयक लोकप्रिय देशभ्रातार वाघमारे यांच्या घरी पोहोचल्या. तेथे त्यांना बालिका आढळून आली. गोंदिया येथून मुलीला आणले, असेल मालती हिने पथकाला सांगितले. दरम्यान अधिक चौकशीसाठी मालती वाघमारे हिला भंडारा येथे महिला बालकल्याण विभागात ३ रोजी बोलविण्यात आले होते. मात्र ती उपस्थित झाली नाही. त्यामुळे चाईल्ड हेल्पलाइनच्या समन्वयीकांच्या वतीने संपूर्ण प्रकरणाची माहिती मराठी पोलिसांना देण्यात आली. मराठी पोलीस ठाण्यातील पथक ताबडतोब वाघमारे यांच्या घरी पांढराबोडीला पोहोचले मात्र, महिला बालिकेला घेऊन चारचाकीने निघून घेल्याचे शेतकऱ्यांनी सांगतात पोलिसांनी नाकाबंदी करीत कुशारी फाटा येथे वाहन अडविले. वाहनात पूर्णिमा धुर्वे दहा दिवसाच्या बालिकेसोबत सापडल्या. बालिकेच्या अधिकृत माता-पित्या संदर्भात किंवा कागदपत्राच्या अनुषंगाने त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाही.

# प्रख्यात शिवकथाकार विजयराव देशमुख यांचे निधन

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

प्रख्यात शिवकथाकार आणि धर्मभास्कर अशी उपाधी मिळालेले सद्गुरूदास महाराज उपाख्य विजयराव देशमुख (८४) यांचे बुधवारी सायंकाळी ७ वाजून ५ मिनिटांनी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्यावर विवेक रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या जाण्याने छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक व गुरुमंदिर परिवाराचा आधारस्तंभ निखळला आहे.

अभ्यासपूर्ण विवेचन, रसाळ व ओघवती भाषाशैली हे त्यांच्या व्यक्तीमत्वाची ओळख होती. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तळागाळात पोचवण्यासाठी सद्गुरूदास महाराजांनी आपले अखंड आयुष्य वाहून घेतले. छत्रपतींना अपेक्षित रयतेचे राज्य तळागाळात रुजवण्यात सद्गुरूदास महाराजांनी मोलाची कामगिरी केली. अथक परिश्रम, संशोधन, असंख्य साधने, कागद-पत्रांचा चिकित्सक अभ्यास करत सद्गुरूदास महाराजांनी त्याला पुरावे आणि दाखल्यांची जोड दिली. रसाळ व ओघवती भाषाशैली हे त्यांच्या शिवचरित्राचे वैशिष्ट्य होते. त्यांनी लिहिलेचे शककर्ते शिवराय हे द्विखंडात्मक शिवचरित्र अल्पावधीतच रसिकमान्य झाले. शिवकार्य हा त्यांच्या जीवनाचा दैदिप्यमान पूर्वार्ध तर गुरुकार्य हा उत्तरार्ध होता.



सदगुरुदास महाराजांना लहानपणापासूनच शिवाजी महाराजांबद्दल आकर्षण होते. वाचनाची आवड, निडरता, धाडसी, वृत्ती, तरल संवेदनशील मन, एकाग्रता हे गुण बाळगत त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी जीवनाचे ध्येय निश्चित केले. त्या दिवसापासून आजतागायत परमपूज्य विष्णुदास महाराजांच्या आज्ञेनुसार त्यांनी स्वतःला वाहून घेतले. महाविद्यालयीन जीवनात त्यांनी बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरित्रावर व्याख्याने ऐकली आणि त्यांचे शिवप्रेम अधिकच वृद्धिंगत झाले.

त्यानंतर सदगुरुदास महाराजांनी तरुणांना कथा रूप शिवचरित्र सांगण्यास सुरुवात केली. गणेशोत्सवापासून व्याख्यानामालेच्या माध्यमातून त्यांची शिवचरित्र सांगण्याची भाषा शैली, वक्तृत्व अल्पावधीतच भावले. यातून जनमानसानेच त्यांना शिवकथाकार ही पदवी बहाल केली. यातूनच त्यांनी शिवदुर्ग दर्शन यात्रेची कल्पना मांडत १९७४ ला गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर शिवदुर्ग यात्रा काढली. रायगडावर छत्रपतींच्या सिंहासनाजवळची माती कपाळी लावून सदगुरुदासांनी "महाराज! मी सर्व सामर्थ्यांनीशी आपली शब्दपूजा बांधीन." असा प्रण केला. त्यांची ही शिवदुर्ग यात्रा १९९२ पर्यंत अखंड चालली.

याच दरम्यान 'अभिनव ठेव योजना' अंतर्गत पाच वर्षासाठी लोकांकडून शंभर रुपयांची ठेव घ्यायची व त्याच्या व्याजावर ग्रंथ निर्मितीचा खर्च करून, पाच वर्षांनंतर ठेवेसह ग्रंथ लोकांना विनामूल्य द्यायचा. या अभिनव योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शिवचरित्र लिहीत असतानाच 'सिंहासनाधीश्वर' हे नाटक, 'महाराजांच्या मुलखात', 'सूर्यपुत्र' आदि ग्रंथांची सदगुरुदास महाराजांनी निर्मिती केली.

# यूजीसीच्या समर्थनार्थ समता सैनिक दलाचे आंदोलन

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

केंद्र सरकारकडून यूजीसीचा नवीन कायदा केला आहे.या कायद्यावरून देशात दोन गट पडले आहे. तर सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याला स्थगिती दिली आहे. हा कायदा लागू करण्याची मागणी होती आहे. याच्या समर्थनार्थ समता सैनिक दल सुद्धा उतरला आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात वाटा व त्यासाठी कायदा करावा, अनुसूचित जाती, जमातींना अर्थसंकल्पात मिळालेली निधी इतरत्र वळविणे बंद करावे, त्याचप्रमाणे यूजीसीचा कायदा लागू करावा यासह इतर मागण्यासाठी समता सैनिक दलाच्या वतीने संविधान चौक येथे नारेनिदर्शने करण्यात आले.



महाराष्ट्र बौद्ध , अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त भटके यांची टक्केवारी ३३.५ इतकी आहे. १९८० च्या दशकात भारतात अनुसूचित जातीवरील अत्याचारांचे प्रचंड वाढ झाली देशपातळीवर याची कारणे शोधली गेली असता जातीय भेदभाव व केंद्र आणि राज्य सरकारने अर्थसंकल्पात केलेला भेदभाव हे दोन कारणे समोर आलीत. पागे समितीनुसार महाराष्ट्राच्या व केंद्राच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त भटक्या जातीसाठी पंधरा टक्के वाटा पाहिजे. परंतु आजही तो वाटा देण्यात आला नाही. विद्यार्थ्यांचे शुल्क माफ व शिष्यवृत्ती योजना अग्रक्रमाने राबविणे, विशेष खासगी व विनाअनुदानित उच्च शिक्षण संस्थांमध्ये शुल्क माफी व शिष्यवृत्ती योजना काटेकोरपणे राबविणे, आरटीईची व्याप्ती वर्ग बारावीपर्यंत वाढविणे, विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्था यामधील मागासवर्गीयावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद बसण्यास व प्रभावी यूजीसी कायदा लागू करणे, तहसील जिल्हा व शहरांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व्यावसायिक संकुल उभारणे व अनुसूचित जातीच्या युवकांना स्वयंरोजगार करिता जागा उपलब्ध करून देणे. रमाई घरकुल योजनेचा नियतव्यय पाच लक्ष इतका वाढविणे आदी मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

मागण्या पूर्ण न झाल्यास वर्षभर वेगवेगळ्या ठिकाणी नारे निदर्शने करून करण्याचा इशारा देण्यात आला. या आंदोलनात मार्शल नागसेन बडगे गुणरत्न रामटेके,राहुल तामगाडगे, संजय फुलझेले, प्रतिभा कोचे, चंचला मुरारकर, आरती गायकवाड, अनिता बडोले, रवी भगत, अनिल गरडकर, गौतम फुललेले, स्मीता बडगे, किरण पाटील, शुभांगी लामसोंगे,सोनाली गजभिये यांच्यासह मोठ्या संख्येने समता सैनिक दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेगावीच्या राणाची ख्याती सातासमुद्रापार! अमेरिकेत गजानन महाराज प्रगटदिन साजरा

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**

विदर्भ पंढरी शेगाव येथील गजानन महाराज यांचे देशभरात लाखो भक्त आहे. या भक्तीला देशाची मर्यादा देखील उरली नसून शेगावीचा राणा अर्थात गजानन महाराजांची ख्याती साता समुद्रापल्याड पोहोचली आहे. नुकताच महाराजांचा प्रगट दिन शेगावासह सर्वत्र साजरा करण्यात आला.

राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे सतत चर्चेत असलेल्या अमेरिका देशातही यंदाही गजानन महाराज प्रगट दिन विधिवत व उत्साहात साजरा करण्यात आला आहे. गजानन महाराजांचा प्रगटदिन अमेरिकेतील ऑर्लैंडो येथे हिंदू सोसायटी ऑफ सेंट्रल फ्लोरिडा मंदिरात अत्यंत उत्साह व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव ( तालुका मेहकर) येथील रहिवासी तथा सुमारे साडेतीन दशकापूर्वी अमेरिकेत स्थायिक झालेले प्रशांत सावजी यांनी यासाठी पुढाकार घेतला.



अनेक वर्षांपासून त्यांच्या पुढाकाराने तिथे प्रगट दिन साजरा करण्यात येतो. यंदाचा प्रगट दिन देखील याला अपवाद नव्हता. यंदाच्या उत्सवात डॉक्टर सागर जोशी आणि डॉ. नेहा सावजी यांच्या हस्ते अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यानंतर विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण, भजन व आरतीचे आयोजन करण्यात आले. शेकडो आबालवृद्ध भाविकांनी उत्सवाला हजेरी लावून महाप्रसादाचा लाभ घेतला.

# कंटेनरसह 36 लाखांचा बनावट मद्यसाठा जप्त

## अंड्यांच्या ट्रे आडून वाहून नेण्यात येत होता देशी -विदेशी मद्यसाठा

**विदर्भ केसरी।**

गोवा, मध्य प्रदेश या परराज्यात निर्मित आणि महाराष्ट्राची एक्साइज ड्युटी बुडवुन विक्री करण्यात येत असलेला तब्बल ३६ लाख रुपये किमतीचा बनावट देशी-विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास यवतमाळ-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या राळेगाव ते अल्लीपूर मार्गावरील कमळनेर फाट्यावर केली. या कारवाईने अवैध मद्य विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.



वर्धा येथून बनावट मद्यसाठा कंटेनरमध्ये येत असल्याची गोपनीय माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाला मिळाली. या माहितीवरून राज्य उत्पादन शुल्क यवतमाळच्या अधिकारी, कर्मचारी यांनी विभागीय भरारी पथकासह राळेगाव ते अल्लीपुर मार्गावरील कमळनेर फाट्यावर सापळा रचला. वर्धेकडून यवतमाळकडे येत असलेल्या एका १० चाकी कंटेनर क्रमांक एमएच ०४ एचडी ०२९८ ला आणि त्याच्या मागे असलेल्या टाटा कंपनीच्या एमएच ३० बीडी ३८८१ क्रमांकाच्या वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी दोन्ही वाहनांचे चालक अंधारात पसार झाले. त्यात कंटेनरमध्ये अंड्यांच्या कागदी ट्रेच्या गठ्ठ्यांच्या मागे लपवुन मद्यसाठा वाहुन नेण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे.

यावेळी कंटेनरमधून गोवा आणि मध्य प्रदेश राज्यात निर्मित आणि एक्साइज ड्युटी बुडवुन महाराष्ट्रात आलेला बनावट देशी-विदेशी मद्याचा तब्बल ६१३ पेटी साठा आढळुन आला. त्याचप्रमाणे दुसऱ्या टाटा वाहनातुन देशी मद्याचे ३० पेटी जप्त करण्यात आल्या. या कारवाईमध्ये सुमारे ७० लाख रुपये किमतीची तीनही वाहने आणि ३६ लाख रुपये किमतीचा देशी-विदेशी मद्याचा साठा असा एकुण १ कोटी ५ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही तीनही वाहने आणि जप्त मद्याचा साठा उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात आणण्यात आला. या कारवाईची माहिती मिळताच उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर यांनी यवतमाळमध्ये भेट दिली.

पकडलेल्या तिसरे वाहनात ४० मद्यपेट्या ही कारवाई सुरू असतानाच एका कार क्रमांक एमएच २९ बीव्ही ७२२७ त्या ठिकाणी मद्यसाठा घेण्यासाठी दाखल झाली होती. मात्र कारवाई पाहुन त्यांनी वर्धेकडे पळुन जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या वाहनाचा पाठलाग करुन करुन त्याला वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर थांबवण्यात आले. या वाहनाचा चालक देखील पळून जाण्यात यशस्वी झाला आहे. त्या वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये देखील देशी मद्याच्या ४० पेटी आढळुन आल्या.

या कारवाईमध्ये यवतमाळ, वर्धा, नागपूर या तीन जिल्ह्यातील उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. त्यासोबतच अमरावती येथील विभागीय भरारी पथकही सहभागी होते. ही कारवाई अमरावतीचे विभागीय उप आयुक्त डॉ. पराग नवलकर, अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक पी. एस. बोढारे, दिवाकर वाघ, मुकुंद चिटमटवार, धर्मेंद्र त्रिपाठी, दुय्यम निरीक्षक चंद्रकांत नागुलवाड, दिलीप वल्के, निलेश वानखडे, संजय बोडेवार, सुरेंद्र बुटले, अनिल पिकले, दिपक तरसे, राजेश जायकर, सागर वानखडे, सुकेशनी शिंदे यांच्यासह कर्मचारी अविनाश पेंदोर, शंकर घाटे, अजीज पठाण, मनोहर शेंडे, सतीश घाडगे, संदीप दुधे, महेश खोब्रागडे, स्नेहा बाळबुधे, प्रवीण मसराम, अमोल बोथले, राम पवार, निखिल दहेलकर, महेंद्र रामटेके आदींनी पार पाडली.

**■ गोवा राज्यात तयार करण्यात आलेले मद्य एक्साइज ड्युटी चुकवुन महाराष्ट्रात आणायचे. त्यानंतर त्या मद्याच्या बाटल्यांवर लावण्यात आलेले गोवा राज्याचे स्टीकर काढुन त्यावर महाराष्ट्र राज्यातील मद्याचे बनावट तयार केलेले मात्र खरे वाटणारे स्टिकर लावायचे आणि चढ्या दराने त्याची विक्री करायची असा प्रकार सुरू होता.**

# दुरवस्थेच्या दोन बाजू

*अग्रलेख*

कोणत्याही सुविधांमध्ये काहीही अडथळे आले आणि त्याचे रूपांतर संकटात होण्याची चिन्हे दिसू लागली की सरकारी यंत्रणा सहसा सर्वांसाठी एक सामायिक सूचना जारी करतात. ती म्हणजे, आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नका, प्रवास टाळा! असे केले की संकटाची किंवा समस्येच्या गांभीर्याची झळ पोहोचणार नाही आणि संकटाच्या आसपास असण्याची शक्यतादेखील उरणार नसल्याने सर्वांच्या मनातील सुरक्षेची आश्वस्त जाणीव फारसे काही न करतादेखील सुरक्षित राहून सुरक्षा यंत्रणांवरील ताणही कमी होईल हे संबंधितांस माहीत असते. शिवाय, समस्येच्या झळा सोसाव्या लागणार नसल्यामुळे त्याच्या जबाबदारीचे खापर संबंधित यंत्रणांवर फोडण्याची संधीदेखील समाजास मिळणार नाही याचीही खात्री असते. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवणारा महामार्ग म्हणून ज्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचा अभिमानाने उल्लेख केला जातो, त्या मार्गावर तब्बल दीड दिवस पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक एका अपघातामुळे जागच्या जागी थांबली. वाटेवरच्या हजारो वाहनांच्या मैलोगणती रांगांनी रस्ता पूर्ण भरून गेला आणि असंख्य समस्यांच्या भयाने थिजलेली माणसे अक्षरश: हवालदिल झाली. या अपघातस्थळापासून 20 किलोमीटर अंतरावर एकाच जागी थांबून ताटकळलेल्या वाहनांस तर पुढे काय झाले आहे तेदेखील नेमके कळत नव्हते. अशा संकटातही, महामार्गावरील टोल वसुली मात्र, पुढे काहीच घडलेले नाही अशा थंडपणाने सुरूच होती. एका विषारी, ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर घाटात उलटल्याने वायुगळती सुरू झाली असून पुढे जाणे धोक्याचे आहे हे कळण्यासाठीही अनेक वाहनधारकांना कित्येक तास लागले आणि सुरक्षा यंत्रणांना अपघाताचा सुगावा लागेपर्यंत वाहनांच्या रांगेचे शेपूट मैलामैलाने वाढतच राहिले. लहान मुले, महिला, वृद्ध माणसे, महत्त्वाच्या वा तातडीच्या कामाकरिता मुंबईकडे निघालेले नागरिक, विमान प्रवासाकरिता मुंबई गाठण्याची घाई करणारी माणसे, हातावरचे पोट असलेले कष्टकरी, अशा सर्वांनाच अशा समस्यांचा सरसकट फटका बसत असतो. महागड्या आलिशान गाडीतील धनवंत किंवा एखाद्या मालवाहू गाडीच्या हैद्यातून प्रवास करणारा सामान्य हमाल हे सारख्याच प्रमाणात हलाखीचा अनुभव घेतात. असा भेदभाव पुसून टाकणारे एक संकट तब्बल 33 तास महामार्गावर दाटून राहिले, आणि ते गंभीर होत असल्याची जाणीव होऊ लागल्यावर संबंधित यंत्रणांनी तोच, नेहमीचा संदेश जारी केला. अत्यंत आवश्यक नसेल तर या मार्गावरील प्रवास टाळा अशा सूचना माध्यमे, समाजमाधमांवरून जारी झाल्या, तेव्हा त्याआधीच प्रवासकोंडीत अडकलेले हतबल प्रवासी संकटातून सुटकेची प्रतीक्षा करत सरकार आणि सुरक्षा यंत्रणांकडे आशेने नजरा लावून ताटकळत होते. यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग असे या महामार्गाचे नाव असले, तरी अलिकडच्या काही वर्षांपासून या मार्गावरून द्रुतगती तर दूरच, किमान सरासरी वेगाने वाहने चालविणेदेखील दुरापास्त होऊ लागले आहे. या समस्येस सर्वस्वी सरकार जबाबदार आहे असे सरसकटपणे म्हणता येणार नाही, पण समस्येवर तोडगा असूनही सरकारी यंत्रणा त्याकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप होत असल्याने, सरकारवरील जबाबदारीही दूर करता येणार नाही. कोणत्याही रस्त्यावर वाहनांच्या वाहतुकीची एक शिस्त असते. त्यासाठी काही कायदे, नियमही आखलेले असतात आणि ते पाळणे ही नागरिकशास्त्र म्हणून समाजाचीही जबाबदारी असते. पण आजकाल अनेकदा वेळेबरोबर धावण्याच्या अपरिहार्य स्पर्धेमुळे पायालादेखील भिंगरी लावून पळापळ करणारा समाज नियम पाळून वेळ वाया घालवण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. त्यासाठी प्रसंगी तो दंडात्मक कारवाईदेखील ओढवून घेतो आणि नियमाच्या कचाट्यातून सुटका करून घेतो. कदाचित त्यामुळेच, नियम मोडणारी माणसे हा दंडाच्या महसुलाचा मोठा स्रोत ठरू लागला असून वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी नेमक्या जागी उभे राहण्याऐवजी दडी मारून बसणे व नियम मोडणाऱ्याकडून वसुली करणे हीच 'ड्युटी' मानण्याचा गैरसमजही वाढीस लागला असावा. यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर तर वाहतुकीची शिस्त आणि नियम मोडण्याची शर्यतच सुरू असल्याने वसुलीचे कुरण म्हणूनच या महामार्गाची ओळख निर्माण झाली आहे. वाहतुकीचे नियम मोडल्याबद्दल व शिस्त न पाळल्याबद्दल कॅमेऱ्याद्वारे पकडल्या जाणाऱ्या वाहनांकडून केल्या जाणाऱ्या वार्षिक दंडवसुलीचा आकडा काही शेकडा कोटींच्या घरात गेल्याची माहिती अलिकडेच उघडकीस आली होती. कदाचित, वाहतुकीचे नियम मोडणारी वाहने हा महसुलाचा मोठा स्रोत ठरत असल्यामुळेच त्या बेशिस्तीकडे कानाडोळा होत असला, तरी शिस्तीत जाणाऱ्या वाहनधारकांची परवड तरी लक्षात घ्यायला हवी. तसे होत नाही हाच बहुतांश खाजगी वाहनधारकांचा अनुभव असतो. हीच बाब महामार्गांवर किंवा स्थानिक रस्त्यांवरही दिसत असल्याने, जेव्हा अशाच अपघातातून समस्या उग्र होतात तेव्हा लोकांनाच घराबाहेर न पडण्याच्या सूचना देऊन समस्येची झळ शमविण्याचे प्रयत्न सुरू होतात. मुळात, हेच टाळण्याची गरज या महामार्गावरील ताज्या समस्येने अधोरेखित केली आहे. मुंबई-पुणे दरम्यानचा हा महामार्ग केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर देशातील रस्ते वाहतुकीचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग आहे, त्यामुळे अशा घटना वारंवार घडत असतील तर त्यावर तातडीने योग्य उपाययोजना करण्याकरिता कठोर होण्याची गरज आहे. या उपाययोजना फारशा अवघड नाहीत, हे एव्हाना स्पष्ट झालेले आहे.

# बोलेरो पिकअपसह 4 गोवंश जप्त

**विदर्भ केसरी। उमरखेड,**

ढाणकी रोड बायपास पुलासमोर पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान एका बोलेरो पिकअपमधून चार गोवंश जनावरे अमानुष अवस्थेत वाहतूक करताना पकडली. वाहनासह सुमारे 5 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चालक-मालकाविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई 11 फेब्रुवारीच्या दुपार दरम्यान करण्यात आली.

देवराव गोमाजी मुरमुरे (वय 36, पिरंजी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. गोपनीय माहितीनुसार, बोलेरो पिकअप क्रमांक एमएच26 एडी9164 मध्ये काही गोवंश जनावरे कोंबून, चारापाण्याची कोणतीही सोय न करता बाळदी रोडने उमरखेडकडे येत असल्याची माहिती मिळाली. पोलिस पथकाने ढाणकी रोड बायपास येथे नाकाबंदी केली. तपासणीदरम्यान संबंधित पिकअपमध्ये दोन काळ्या व दोन पांढèया रंगाची अशी चार गोवंश जनावरे दाटीवाटीने, आखूड दोरीने बांधून, हालचालीसाठी पुरेशी जागा न देता वाहतूक करताना आढळली.

# चांदूर बाजारमध्ये अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

## निंभोरा येथे महसूल विभागाची धडक कारवाई, तस्करांमध्ये खळबळ

**विदर्भ केसरी।**

चांदूर बाजार तालुक्यात महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात मोहीम तीव्र केली आहे. या मोहिमेअंतर्गत मंगळवारी रात्री निंभोरा येथे वाळूची अवैध वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. या धडक कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध रेती तस्करांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून वाळूची अवैध वाहतूक पकडण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून निंभोरा परिसरात रात्रीच्या वेळी वाळूची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती.



या माहितीची खात्री पटल्यानंतर संबंधित ठिकाणी पथक तैनात करण्यात आले होते. वाळूने भरलेला ट्रॅक्टर क्रमांक एमएच २९, बीसी ३७६३ महसूल पथकाने जप्त केला. प्राथमिक चौकशीतून ही वाळू कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी विलास ढोले, जगदीश पानसे, प्रतिक चव्हाण आणि पद्माकर झळके यांचा सहभाग होता. जप्त केलेला ट्रॅक्टर आणि वाळू महसूल विभागाने ताब्यात घेतली असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

महसूल विभागाने अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिकांनीही महसूल विभागाच्या या कारवाईचे स्वागत केले असून, भविष्यातही अशाच कठोर कारवाया करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# विद्यार्थिनीने बी. टेकमध्ये पटकावली आठ पारितोषिके

## तीन सुवर्ण ,एक रौप्य,चार रोख पारितोषिकांचा समावेश

**विदर्भ केसरी।**

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे दि. ५ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाचा ४० वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. त्याअनुषंगाने विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयांची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली होती. यामध्ये कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, जळगाव जामोद येथील विद्यार्थिनी स्वप्ना सुभाष जामनिक हिने यशस्वीरित्या बी. टेक पदवी पूर्ण करून विद्यापीठातून प्रथम येण्याचा मान पटकावला.



या दीक्षांत समारंभामध्ये स्वप्ना सुभाष जामनिक हिला तीन सुवर्ण पदक, एक रौप्य पदक व चार रोख पारितोषिके डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एस.आर.गडाख, आनंद कृषी विद्यापीठ, गुजरातचे कुलगुरू डॉ.के.बी.कथीरिया, महात्मा फुले फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून गौरवण्यात आले आहे.

**■ स्वप्नाला मिळाले हे पुरस्कार**

{ ISAE Convention मेमोरियल सुवर्ण पदक आणि पारितोषिक. { स्व.अजित बेनिराम हारोडे स्मृती सुवर्णपदक. { भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी सुवर्णपदक. { गंगाधर हरी पराडकर रौप्य पदक. { गंगाधर हरी पराडकर रोख पारितोषिक. { प्रा.मेमन अली मोहम्मद रोख पारितोषिक. { प्रा.श्रावण सावजी वंजारी स्मृती रोख पारितोषिक. { डॉ.व्ही.एन.मदनसुरे रोख पारितोषिक.

# महसूलचा दणका ; वर्षभरात 62 प्रकरणांत 63 लाखांचा दंड वसूल

**विदर्भ केसरी।**

तालुक्यातील अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून, गेल्या १० महिन्यांत ६२ प्रकरणांमध्ये तब्बल ६३ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. मात्र, यापैकी २८ लाख रुपयांची थकबाकी अद्यापही कायम असून, महसूल विभागाच्या या कारवाईनंतरही तालुक्यातील अवैध गौणखनिज उपसा थांबण्याचे नाव घेत नाहीये. विशेष म्हणजे, माफियांकडून स्वनिर्मित रेती घाटांतून दिवसाढवळ्या लाखो रुपयांची लूट सुरू असल्याचे धक्कादायक चित्र या अहवालामुळे समोर आले आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, उमरखेड तहसील अंतर्गत एकूण ६२ अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणे नोंदवण्यात आली. या प्रकरणात एकूण ६३ लाख ७१ हजार ८४५ रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, त्यापैकी ३५ लाख २३ हजार ९५९ रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. मात्र अद्यापही २८ लाख ४७ हजार ८८६ रुपयांची थकबाकी शिल्लक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या कालावधीत अवैध उत्खनन व वाहतुकीसंदर्भात १० गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यामध्ये ३ लाख २५ हजार ९२८ रुपयांचा दंड आकारण्यात येऊन संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. यामुळे या प्रकरणांत कोणतीही थकबाकी शिल्लक नाही. या दहा महिन्याच्या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईतही प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येते. मात्र यापेक्षा दुप्पट ही अवैध गौण खनिज व रेती उत्खनन झाल्याचे पाहायला मिळत असल्याचे नागरिकात चर्चा आहे.

या कालावधीत दाखल गुन्ह्यांमधून ६६ लाख ९७ हजार ७७३ रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, त्यापैकी ३८ लाख ४९ हजार ८८७ रुपये वसूल झाले आहेत. उर्वरित २८ लाख ४७ हजार ८८६ रुपये दंडाची थकबाकी अजूनही वसूल होणे बाकी आहे. विशेष म्हणजे, या विवरणपत्रामध्ये उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्याकडून वाहनांवर आकारण्यात आलेला दंडही अंतर्भूत करण्यात आला आहे.

# चंद्रपूरचा निर्णय देवेंद्र फडणवीस-बावनकुळेंच्या अनुमतीनेच

**विदर्भ केसरी।**

उबाठा आणि भाजप युतीबाबत मी स्वत: कोठेकर यांच्याशी दिवसातून चारदा चर्चा करायचो आणि बावनकुळे यांच्याशी चर्चा करायचो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अनुमती घेतली जेव्हा उबाठाला एक वर्ष देण्याची चर्चा सुरू असताना मुख्यमंत्र्यांना या संदर्भातील माहिती दिली. तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले एक वर्ष नाही गरज असेल तर सव्वावर्ष द्या. महापौर हा भाजपचा झाला पाहिजे, पहिले महापौर आमच्याकडे असावा, असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.



सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूर भाजपमध्ये दोन गट आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे काही कार्यकर्ते चाणाक्य, किंगमेंकर अशी बॅनरबाजी करतात. कार्यकर्त्यांना गटनेता आपल्या गटाचा झाला नाही याचे वाईट वाटले होते पण महापौर आपला झाल्याने त्यांना आनंद झाला. कुणी क्रेडिट घेऊन काय फायदा करार कुणासोबत झाला आहे? असा टोला आमदार जोरगेवार यांना लगावला आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अनुमतीने संगीताताई खांडेकर यांचे नाव रवींद्र चव्हाण यांनी लेखी दिल्यावर आमच्या पक्षाच्या दुसऱ्या एका नेत्याने सारिकाताई संदूरकर यांना भरीस घातले आणि कारण दिनले की पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला तर काय? मग तोच नियम त्यांच्या गटाचे उपमहापौर होते त्यांचे नाव आले तिथे तसे झाले नाही, असे म्हणत आमदार किशोर जोरगेवार यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे. जनता आणि पत्रकार यांना माहिती आहे मी कुणाबद्दल बोललो.

### एबी फार्म कुणी चोरले चौकशी सुरू

**■ सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्धव ठाकरेंशी बोलतात असे मला कधीही सांगण्यात आलेले नाही. एबी फार्म कुणी चोरले याची चौकशी पक्षाकडून सुरू आहे. काही प्रभागात 3 ते 4 एबी फॉर्म देण्यात आले, ज्या पद्धतीने बदल करण्यात आले त्यांची चौकशी पक्षाच्या बैठकीत केली जाईल.**

### माझ्या गटाचा नाही पक्षाचा माणूस हवा होता

**■ सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूरमध्ये मला पक्षाचे काम करणारा माणूस हवा होता, माझ्या गटाचा तटाचा असे काही नाही. त्यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी गटनेता आमचाच हवा असा आग्रह धरला होता. तेव्हा मी महापौर आमचा द्या असे म्हणाले होतो. चंद्रपूर मनपाचा महाराष्ट्राच्या राजकारणाशी काहीही संबंध नसतो. कुणाकडे बहुमत नव्हते कुणाची तरी मदत घ्यावीच लागणार होती. दोघांना समान संधी होती, आम्ही संधीचे सोने केले.**

# आज बांधकाम कामगारांचा संप

**विदर्भ केसरी। यवतमाळ :**

केंद्र आणि राज्य शासनाच्या कामगारविरोधी धोरणाच्या निषेधार्थ बांधकाम कामगार १२ फेब्रुवारीला संपावर जाणार आहेत. शासनाने बांधकाम कामगार कायद्यातील दुरुस्ती रद्द करुन ते पूर्वीप्रमाणे ठेवावेत, अशी मागणी करत हा संप पुकारण्यात आला आहे.

देशात चार लेबर कोड लागू झाल्यास बांधकाम कामगार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी रद्द होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्वायत्तता संपून सर्वच योजना हंगामी असणार आहेत. सध्या बांधकाम व्यवसायाकडून बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी मिळणारा उपकर इतर सगळ्या उद्योगातील कामगारांकडे फिरवला जाण्याचा धोका आहे. बांधकाम कामगारांच्या जुन्या कायद्यातील सर्व महत्त्वाच्या तरतुदी नवीन कायद्यातून वगळल्या आहेत. म्हणूनच बांधकाम कामगारांचे हक्क अबाधित राहण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षेसाठी नवीन कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द झाल्या पाहिजेत यासाठी बांधकाम कामगारांनी आंदोलन पुकारले आहे. केंद्र व राज्य सरकारकडून सातत्याने राबविण्यात येत असलेल्या कामगारविरोधी धोरणांमुळे देशातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कोट्यवधी कामगारांचे जीवन असुरक्षित झाले आहे, असा आरोप महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे राज्य निमंत्रक शंकर पुजारी यांनी केला आहे. संपात राज्यातील सर्व बांधकाम कामगारांनी संपामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

- चारही श्रमसंहिता तत्काळ रद्द कराव्यात. - बांधकाम कामगारांना प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी, ग्रॅज्युएटी, पेन्शन, किमान वेतनसह सामाजिक सुरक्षा कायदेशीर हमी द्यावी. असंघटित कामगारांची सार्वत्रिक नोंदणी करून त्यांना सर्व कल्याणकारी लाभ द्यावेत. कंत्राटीकरण व खासगीकरणाला आळा घालावा. - कामगार संघटनांच्या स्वातंत्र्यावर होणारे हल्ले थांबवावेत आदी मागण्या करण्यात येणार आहेत.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ | ३

GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## बेवारस वाळूसाठा जप्त करून लाभार्थ्यांना वाटप

■ डोंगरखर्डा : अंतरगाव येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेसमोर बेवारस पडून असलेला वाळूचा साठा आढळून आला. सदर माहिती अपर तहसीलदार मेटीखेडा यांना मिळाली. जाऊन पाहणी केली असता या वाळूसंदर्भात कुणीही मालकी दाखविली नाही. त्यामुळे कळंब तहसीलदार यांच्या निर्देशानुसार अंतरगाव येथील ५ घरकुल लाभार्थ्यांना या वाळूचे वाटप करण्यात आले. यावेळी अपर तहसीलदार कार्यालय मेटीखेडाचे नायब तहसीलदार अनिल राजगुरे, ग्राम महसूल अधिकारी धनंजय काळे, गजानन राजहंस, अनिल गेडाम उपस्थित होते.

महत्त्वाचे




## जि प प्राथमिक मराठी शाळा येथे वार्षिक स्नेह संमेलन

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

दिनांक:-१०/२/२०२६ मंगळवार रोजी पुसद तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा माणिकडोह येथे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात पार पडले. लहान लहान चिमुकल्या मुला मुलींनी शाळेच्या स्नेहसंमेलनात आपले नृत्य सादर केले. या नृत्य स्नेहसंमेलनात कु.राजश्री अविनाश भोजु राठोड व ईतर चमू यांनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलनात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गावातील प्रथम नागरिक सरपंच सौ.मनकर्णा सुखदेव आसोले होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यक चौधरी सर हे होते. या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित झुंजारे सर, शेख सर, देशमुख सर,सरनाईक मॅडम, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ आरती पंडित चव्हाण, तंटामुक्तीचे अध्यक्ष विठ्ठल फकीरा आडे, सुरेश शामराव तडसे, सौ उज्वला विकास ढोले ग्रामपंचायत सदस्य, सविता ढोले शाळा समिती सदस्य, शंकर जेमला राठोड गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्यानबाराव ढोले, उद्धव महाराज मोहेकर, अविनाश भोजू राठोड सामाजिक कार्यकर्ता, आणि गावातील असंख्य नागरिक तथा पालक उपस्थित होते.

## छत्तीस वर्षीय नागरिकावर चाकू हल्ला; वाडेगाव येथील घटना!

**विदर्भ केसरी। बाळापूर**

तालुक्यातील वाडेगाव येथे छत्तीस वर्षीय नागरिकावर पैशाच्या कारणांमुळे चाकू हल्ल्या केल्याची घटना दिनांक १० फेब्रुवारी रोजी रात्री अकरा वाजताच्या सुमारास घडली असून या बाबतीत एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार शेख मतीन शेख खलील राहणार सोफी चौक वाडेगाव यांनी बाळापुर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून त्यामध्ये छत्तीस वर्षीय शेख आरीफ शेख रउफ यांना आरोपी शेख सलीम उर्फ बाबू जमदार तसेच शेख साहील शेख सलीम यांनी पैशाच्या कारणा वरुन चाकू हल्ला करून जखमी केले त्यामुळे जखमी झालेल्या छत्तीस वर्षीय नागरिकाला उपचार संदर्भात जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला येथे भरती करण्यात आले असून आरोपी शेख सलीम उर्फ बाबू जमदार तसेच शेख साहील शेख सलीम यांच्या वर ११८(२) ३५२ . ३(५) BNS कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर वाद पैशाच्या देवान घेवान वरुन झाल्याची माहिती समोर आली आहे . घटनेचा अधिक तपास वाडेगाव पोलिस चौकी चे प्रभारी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक संभाजी हिवाळे करीत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.तर दिनांक अकरा फेब्रुवारी रोजी ठसे तज्ञ पथक घटनास्थळी दाखल झाले होते.

# त्या शेतकऱ्यांना कबुल केलेला पीकविमा तातडीने द्यावा

## हजारो शेतकरी हवालदिल; लोकविकास संघटनेचे निवेदन

**विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:**

**महाराष्ट्र शासनाने राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या विशेष पॅकेजमध्ये विमाधारक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १७ हजार रुपये मदत देण्याचे स्पष्टपणे कबूल केले होते. मात्र, ही घोषणा होऊनही आजपर्यंत राज्यातील सुमारे ४५ लाख विमाधारक शेतकऱ्यांना अद्यापही ही रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.**




मागील वर्षी अतिवृष्टीने अक्षरशः शेतीपिकाना झोडून काढले,जमिनी खरडून निघाल्या,शेतकऱ्यांचे कंबरडे मोडून आर्थिक गणित कोलमडले. या पार्श्वभूमीवर लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी मुख्यमंत्र्यांना तहसीलदार,चांदूर बाजार यांच्यामार्फत सविस्तर निवेदन पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. निवेदनात भालेराव यांनी नमूद केले आहे की, अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागांत शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. विशेषतः विमाधारक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १७ हजार रुपये मदत देण्याची घोषणा ही अत्यंत महत्त्वाची होती. मात्र, प्रत्यक्षात ही मदत अजूनही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढत असून शेतीसाठी लागणारे बी-बियाणे,खते व दैनंदिन खर्च भागवणेही कठीण झाले आहे. निवेदन देताना गौरव वैद्य,अंकुश धाकडे,संविधान मोहोड,श्रेयस बर्वे,ऋषिकेश रडके,महादेव भालेराव,अजय सोनोने,शाम पारीसे,उमेश तायडे,जावेद पठाण,कमलेश धाडसे,आकाश खेलदार,यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

### आश्वासनांची पूर्तता तात्काळ करा!!

■ आश्वासनांची तात्काळ अंमलबजावणी करणे ही नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. गोपाल भालेराव यांनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केले आहे की, या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून राज्यातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना तातडीने पीक विम्याची रक्कम वितरित करण्यात यावी. अन्यथा, लोकविकास संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. तर या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असे निवेदनातून स्पष्ट केले आहे.

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेत्रे यांची गावांना भेट

### प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांची उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने केली पाहणी

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी पुसद विजय निखाते**



प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, ३१ मार्च २०२६ ही घरकुल पूर्ण करण्याची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. तर १ मे २०२६ रोजी गृहप्रवेश व्हावा, यासाठी जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे. हक्काच्या घरकुलापासून एकही लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी यंत्रणेला १ मेपर्यंतचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आव्हान देण्यात आले आहे. राहण्यासाठी स्वतःचे हक्काचे घर असावे, हे प्रत्येकाचे स्वप्न असते. मात्र जागा व आर्थिक परिस्थितीअभावी अनेकांचे घरकुलाचे स्वप्न अपूर्ण राहते. हे स्वप्न साकार करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने गती घेतली असून, गावागावात प्रभात फेरी काढून घरकुलाबाबत जनजागृती केली जात आहे. तालुक्यातील आसोली, गौळ (खु.), शिळोणा, वेणी खुर्द, शेलु बुद्रुक, या गावांना दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी यवतमाळ जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेत्रे यांनी भेट दिली. यावेळी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पहिला हप्ता वितरित झालेल्या घरकुलांची पाहणी करून भूमिपूजन करण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना ३० मार्चपर्यंत घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्या लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम समाधानकारकरीत्या पूर्ण केले आहे, त्यांना दुसरा व तिसरा हप्ता तात्काळ वितरित करण्यात येईल, असे आश्वासनही उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेत्रे यांनी दिले. या प्रसंगी पुसद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल आदेलवाड, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी. विलास पिंपळे, ग्रामविकास अधिकारी संजय हिंगाडे, ग्रामपंचायत अधिकारी विजय मुडे, गृहनिर्माण अभियंता, गावातील सरपंच उपसरपंच यांच्यासह आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक आणि महिला बचत गटाच्या महिला आणि गावातील घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मा. शिक्षण आयुक्त ( पुणे ) यांना दिले निवेदन



**विदर्भ केसरी।**

सन 2025 - 26 च्या संच मान्यता मुख्याध्यापक लॉगिन ला आल्या असून अनेक शाळेच्या संचमान्यते मधे विद्यार्थी संख्या असून सुध्दा चुकीच्या आल्या अनेक शाळेच्या संचमान्यता जनरेट झाल्या नाहीत. 10 वी 12 वी च्या बोर्ड परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी यामध्ये समायोजनामुळे अडचण येवू शकते. म्हणून संचमान्यता दुरुस्ती होईपर्यंत समायोजन प्रक्रिया स्थगित करण्यात यावी अश्या आशयाचे निवेदन सोमवार दिनांक 9/2/2026 रोजी मा. शिक्षण आयुक्त पुणे यांना पाठविण्यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ अमरावती जिल्ह्यातर्फे दुपारी 5 वाजता सादर करण्यात आले.

हे निवेदन मा.शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयातील वरिष्ठ लेखाधिकारी मा. श्री देवरे साहेब यांनी स्विकारले.

निवेदन देते वेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार श्री दिलीप कडू , जिल्हाध्यक्ष महानगर अतुल देशमुख , जिल्हाध्यक्ष ग्रामीण श्री दशरथ रसे, जिल्हा कार्यवाह महानगर अरविंद चौधरी , जिल्हा कार्यवाह ग्रामीण आशीष इंगळे, गजेंद्र शेंडे, रविंद्र मांगलेकर, निलेश गणवीर, आर. जी.पठाण , सुनिल डहाके, अतुल पडोळे, नंदकिशोर खडसे, मनिष भुयार, प्रदीप नानोटे, काजी मोहंमद वजाहत अली, रविंद्र हगवणे, भारत शहारे, श्रीकांत कडू , श्रीकांत लाजुरकर आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## यवतमाळ जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रियेला 11 फेब्रुवारीपासून सुरुवात

### 150 पदांसाठी 12 हजारांहून अधिक अर्ज

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील सन 2024-25 या कालावधीतील पोलीस शिपाई संवर्गातील 150 पदे तसेच बँड्समन संवर्गातील 11 पदांसाठी भरती प्रक्रिया बुधवार, 11 फेब्रुवारी 2026 पासून सुरू होत आहे. ही प्रक्रिया पळसवाडी पोलीस कवायत मैदान, दक्षता भवनजवळ, दारव्हा रोड येथे सकाळी 4 वाजल्यापासून पार पडणार आहे.

पोलीस शिपाई पदासाठी 11 ते 23 फेब्रुवारीदरम्यान शारीरिक मैदानी चाचण्या घेण्यात येणार असून बँड्समन पदासाठी 24 व 25 फेब्रुवारी रोजी चाचण्या होणार आहेत. शिपाई पदांसाठी एकूण 12,093 ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये 8,744 पुरुष, सुमारे 2,500 महिला तसेच 849 खेळाडू व माजी सैनिकांचा समावेश आहे. बँड्समनच्या 11 पदांसाठी 1,687 अर्ज आले असून त्यात 1,000 पुरुष आणि 687 खेळाडू व माजी सैनिक उमेदवार आहेत.

पहिल्या दिवशी शारीरिक चाचणीसाठी 750 उमेदवारांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भरती प्रक्रिया सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी सर्व प्रशासकीय आणि सुरक्षा तयारी पूर्ण करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी 60 अधिकारी, 410 पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता यांनी 10 फेब्रुवारी रोजी भरती प्रक्रियेचा आढावा घेत संपूर्ण बंदोबस्ताची रंगीत तालीम केली. शारीरिक व मैदानी चाचण्यांसाठी नियुक्त पथकांची तपासणी करून त्यांनी पारदर्शकतेची खात्री केली.

या भरती प्रक्रियेत RFID या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रिया व्हिडिओ चित्रीकरणाखाली होणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही अफवा, भुलथापा किंवा आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा पोलीस प्रशासनाने केले आहे.

## हरवलेला सहा वर्षीय बालक पित्याच्या स्वाधीन

### ऑपरेशन 'मुस्कान' अंतर्गत पांढरकवडा पोलिसांची तत्पर कामगिरी

**विदर्भ केसरी। पांढरकवडा :-**



मध्य प्रदेशातील ०६ वर्षीय हरवलेल्या चिमुरड्याचा शोध घेऊन त्याला सुखरूपपणे वडिलांच्या स्वाधीन करण्याची उल्लेखनीय कामगिरी पांढरकवडा पोलिसांनी केली आहे. 'ऑपरेशन मुस्कान' या विशेष मोहिमेअंतर्गत ही कार्यवाही करण्यात आली.पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ पासून जिल्ह्यात 'ऑपरेशन मुस्कान' राबविण्यात येत आहे.या मोहिमेचा उद्देश हरवलेल्या महिला,पुरुष,घरून निघून गेलेले व्यक्ती तसेच लहान मुलं-मुली यांचा शोध घेऊन त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करणे हा आहे.दरम्यान,मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी पांढरकवडा पोलिस ठाण्याचे गुन्हे शोध पथक आखाडा वार्ड परिसरात नियमित पेट्रोलिंग करत असताना शासकीय मैदानाजवळ एक ०६ वर्षीय मुलगा घाबरलेल्या अवस्थेत एकटाच उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.पोलिसांनी तात्काळ त्या बालकाला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली. चौकशीदरम्यान मुलाने आपले नाव आयुष युवराज बाहे (वय ०६ वर्षे) असे सांगितले. तो हिंदी भाषिक असून त्याला आपल्या आई-वडिलांचा पत्ता किंवा राहण्याचे ठिकाण स्पष्टपणे सांगता येत नव्हते. परिस्थितीची गंभीरता ओळखून पोलिसांनी त्याला सुरक्षितरित्या पोलिस ठाण्यात आणले आणि त्याचे छायाचित्र पांढरकवडा शहर व परिसरातील विविध व्हॉट्सॲप गटांवर प्रसारित केले.तसेच शहरात प्रत्यक्ष शोधमोहीम राबविण्यात आली. तपासादरम्यान आयुषचे वडील युवराज राम बाहे (वय ३५ वर्षे,रा.शेवटी,जि. बालाघाट,मध्य प्रदेश) हे कामाच्या निमित्ताने पांढरकवडा येथील श्यामनगरी परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली.पोलिसांनी तात्काळ त्यांच्याशी संपर्क साधून खात्री केली.आवश्यक पडताळणीनंतर आयुषला त्याच्या वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले. आपल्या मुलाला सुरक्षित परत मिळाल्याने वडिलांनी पोलिसांचे आभार मानले.ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.पोलिस निरीक्षक एल.डी.तावरे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर,पोलीस हवालदार प्रमोद जुनूनकर,विलास जाधव आणि होमगार्ड रोशन सोमशेट्टीवार यांनी ही कार्यवाही पार पाडली.'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत पांढरकवडा पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे एका निष्पाप बालकाचे कुटुंबाशी पुनर्मिलन शक्य झाले असून,पोलिसांच्या सजगतेमुळे नागरिकांमध्ये समाधान व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे,

## जिल्हाधिकारी यांच्याकडून पेसा ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या ठरावाला केराची टोपली

**विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी- :बबिता शिवणकर**



पैनगंगा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या ( पेसा ) ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या ठरावात घेण्यात आलेल्या मुद्द्याला डावलून जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी स्वतःच्या अधिकारात भुसुरुंग स्फोटाची परवानगी दिल्याने या विरोधात निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने आज जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यावर आक्षेप नोंदविला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की सतत वादग्रस्त ठरलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम कायद्याला बगल देऊन, हिटलरशाही पद्धतीने, जंगल राज प्रमाणे काम सुरू असून पेसा ग्रामपंचायतीला मिळालेल्या मौलिक अधिकाराचे हनन केल्या जात आहे, पेसा ग्रामपंचायतीला संविधानानुसार मिळालेल्या अधिकाराला पायदळी तुडविल्या जात असताना तसेच भूसंपादन कायदा 2013 नुसार अनुसूचित क्षेत्रामधील जमीन घेता येत नाही, जर शासनाला निकड असल्यास कलम 41/3 नुसार संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम सभेची परवानगी घेणे अनिवार्य आहे, परंतु ग्रामसभेच्या ठरावाला डावलून पाटबंधारे विभागाचे अधिकारी निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम जोरकसपणे करत आहे तसेच खडका आणि खंबाळा या दोन गावाच्या मध्ये असलेल्या पैनगंगा नदीवर भिंतीच्या पायवाचे खोदकाम काम सुरू असून त्या कामात भूसुरंग स्फोट, खोदकाम,माती धरणाचे काम व सांडव्याचे काम रात्रंदिवस चालू आहे. सोबतच भुसुरूंग स्फोट केल्या जात आहे.

याबाबत खडका ग्रामपंचायतीने दिनांक 26 डिसेंबर 2025 रोजी ग्रामसभेच्या ठरावात निम्न पैनगंगा प्रकल्पाचे माती धरणाचे काम, सांडव्याचे खोदकाम व भुसुरूंग स्फोट करण्याची परवानगीला मुदतवाढ न देण्याचा ठराव सर्वानुमते पारित केला आहे, भुसुरूंग स्फोटाला हरकत नोंदवून पेसा ग्रामपंचायतच्या परवानगीशिवाय भुसुरूंग स्फोट करू नये असे स्पष्टपणे ग्रामसभेच्या ठरावात नोंदविले आहे. परंतु यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी दिनांक 6 जानेवारी 2026 रोजी पाटबंधारे विभाग व कंत्राटदाराला खडका ग्रामपंचायतच्या हद्दीत भुसुरूंग स्फोट करण्याची स्वतःच्या अधिकारात परवानगी दिलेली आहे, ही परवानगी 31 डिसेंबर 2026 पर्यंत वैद्य असल्याचे नमूद केले आहे.

खडका ही पेसा अंतर्गत येणारी ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीने काही अटीच्या आधीन राहून या प्रकल्पाला मान्यता दिली होती परंतु त्या अटीपैकी एकही अट शासनाने मान्य केली नाही आणि भुसुरुंगाची स्फोट करण्याची परवानगी सपशेलपणे नाकारली असताना सुद्धा जंगल राज प्रमाणे पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कंत्राटदार वरिष्ठांच्या सहकार्याने या भागात भूसुरूग स्फोटाची मालिका रात्रंदिवस राबवून एकप्रकारे आदिवासी क्षेत्रात धुडगूस घालत असल्यामुळे या भागात लोकशाही आहे की ठोकशाही असा प्रश्न या भागातील जनतेत निर्माण झाला आहे. याबाबत आज निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले व त्यांना प्रत्यक्ष भेटीत सांगितले जर तुम्हाला पेसा ग्रामपंचायतीच्या ग्राम सभेच्या ठरावाला डावलून परवानगी द्यायचा अधिकार असेल तर पेसा ग्रामपंचायतचे सर्व अधिकार तुम्ही गोठवून टाका, पेसा ग्रामपंचायतीचे सर्व प्रकारचे अधिकार काढून टाका किंवा तुम्हाला जर तसं लेखी परवानगी द्यायचा अधिकार असेल तर आम्हाला लेखी स्वरूपात उत्तर द्या, अशी मागणी यावेळी धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकांऱ्यानी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे . तेव्हा मा. जिल्हाधिकारी यांनी पाटबंधारे विभागासोबत लवकरच धरण विरोधी संघर्ष समितीची बैठक लावून याबाबत आपण चर्चा करू असे त्यांनी उत्तर दिले.

यावेळी निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. प्रल्हादराव पाटील जगताप, प्रसिद्धी प्रमुख तथा संघटक सचिव मुबारक तंवर, सचिव विजय पाटील राऊत, कोषाध्यक्ष प्रल्हादराव गावंडे सर, रवी ठाकरे, विलास भेंडे, अविनाश जगताप, शंकर संगमवार यांसह अनेक शेतकरी व धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## 'महात्मा फुले, प्रधानमंत्री आरोग्य योजना' लागू

**विदर्भ केसरी। अमरावती**

महानगरपालिकेद्वारे संचालित सर्व १३ शहरी आरोग्य केंद्रांना महात्मा ज्योतिराव फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना आता महागडे उपचार मिळवण्यासाठी दूरच्या रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही, तर शहरी आरोग्य केंद्रांमधूनच योजनांचा थेट लाभ घेता येणार आहे.

मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार ११ रोजी आयोजित महत्त्वपूर्ण सभेमध्ये शहरवासीयांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय घेण्यात आला.या दोन्ही योजनांच्या माध्यमातून एकूण २३९९ आजारांवर पूर्णपणे मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या आरोग्य विमा योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष एकत्रित ५ लाख रुपयांपर्यंतचा उपचार खर्च शासनाकडून केला जातो. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकांतील कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांकडे को-ब्रँडेड 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना गोल्डन कार्ड' असणे बंधनकारक आहे हे कार्ड नसल्यास योजनेचा लाभ मिळू शकणार नाही. त्यामुळे ज्या नागरिकांकडे अद्याप गोल्डन कार्ड उपलब्ध नाही, त्यांनी तात्काळ आपल्या जवळच्या शासकीय दवाखान्यात संपर्क साधून कार्ड तयार करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. गोल्डन कार्ड तयार करताना ई-केवायसी प्रक्रिया आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांचे रेशन कार्ड अद्ययावत व ई-केवायसी झालेले असणे गरजेचे आहे. तसेच आधार कार्ड अपडेट असणे आणि आधारशी संलग्न मोबाइल क्रमांक सोबत असणे आवश्यक आहे

## तूर खरेदी केंद्रावर आवकच नाही

**▸विदर्भ केसरी।**

सोयाबीनप्रमाणे खरिपातील तुरीचीही शासकीय खरेदी हमीदराने करण्यासाठी केंद्रे तयार आहेत. मात्र कोणत्याच केंद्रावर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची तूर अद्याप आलेली नाही. एक फेब्रुवारीपासून खरेदी प्रारंभ झाली आहे. खुल्या बाजारात सध्या तुरीला हमीदराच्या तुलनेत अधिक भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल या बाजाराकडे अधिक आहे. परिणामी शासकीय केंद्रे ओस पडली आहेत. तथापि शेतकऱ्यांनी नोंदणी मात्र केली आहे. शासनाने शासकीय तूर खरेदीचे उद्दीष्ट कमी केले असून प्रतिहेक्टर १२.९० क्विंटल इतकीच तूर खरेदी करण्यात येणार आहे.

**महत्त्वाचे**

## खून करून कालव्यात जाळला मृतदेह

**▸विदर्भ केसरी। पथ्रोट**

शहानूरवरून खोडगावकडे जाणाऱ्या कालव्यातील विहिरीसारख्या खड्ड्यात खून करून मृतदेह जाळला. बुधवारी (ता. ११) अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. घटनास्थळी वाहनाच्या टायरचे निशाण आढळून आले असून, मृतदेह जाळण्यासाठी ऑइलचा वापर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते, असे उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे यांनी सांगितले. जहानपूर- शहानूर धरणावरून पांढरीकडे जाणाऱ्या कालव्यालगत नितीन बडवाईक यांचे शेत आहे. शेतामध्ये लागवडीदार जनार्दन गभणे बुधवारी (ता. ११) सकाळी पिकांवर फवारणी करण्यासाठी गेले होते. त्यांना कॅनलमधून धूर निघताना दिसला. कॅनलमधल्या खड्ड्यात एक मृतदेह जळताना दिसला. वाघडोहचे पोलिस पाटील सुभाष काकड यांच्याकडून पथ्रोट पोलिसांना माहिती दिली. अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्यासह अभय चौथनकर, नरेश धाकडे, रवींद्र शिंपी, प्यारेलाल जवंजाळ, रितेश उघडे, अक्षय पवार, अंजनगावसुर्जीचे ठाणेदार सूरज बोंडे व रहिमापूरचे ठाणेदार अनंत वडतकर यांनी घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक चमूसह श्वानपथकाला पाचारण करण्यात आले होते. अर्धवट जळालेला मृतदेह पुरुषाचा असल्याचे दिसून आले. सदर व्यक्तीच्या डोक्याला व हातापायावर जखमा आढळून आल्या. खुणांनुसार हातपाय बांधून त्याला खड्ड्यात टाकण्यात आले, असा प्रथमदर्शनी अंदाज तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

**■ मृत व्यक्तीची ओळख पटली नव्हती. घटना मंगळवारला रात्रीची असू शकते. दुसरीकडे हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने मृतदेह येथे आणून जाळल्याचे दिसून येते. पथ्रोट ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. -मनीष ठाकरे, उपविभागीय पोलिस अधिकारी, अंजनगावसुर्जी**


## महापालिकेत शिंदे सेना, बसपाची युती

**▸विदर्भ केसरी।**

शिवसेनेचा शिंदे गट व बहूजन समाज पार्टीचा संयुक्त गट तयार झाल्याने महापालिकेतील स्थायी समितीसाठी उद्भवलेला सोळाव्या सदस्य निवडीचा पेच अखेर सुटला आहे. दोन्ही पक्ष मिळून सहा सदस्यांचा गट तयार होत असल्याने एक सदस्य या गटाचा स्थायीमध्ये जाऊ शकणार आहे. संख्याबळ कमी पडत असल्याने हा पेच निर्माण झाला होता. दरम्यान या शिवसेना-बसपा गटाच्या गटनेतेपदी डॉ. राजेंद्र तायडे यांची निवड करण्यात आली आहे. महापौर व उपमहापौर निवडणुकीत शिंदे गटाने भाजपचे समर्थन केले होते, तर बसपाने दोन्ही पदांसाठी उमेदवार रिंगणात उभे केले होते. या निवडणुकीनंतर आता स्थायी समिती स्थापनेचे वेध लागले असून ही निवडणूक २० फेब्रुवारीच्या आसपास होण्याची शक्यता आहे. सोळा सदस्यीय स्थायी समितीमध्ये सभागृहातील संख्याबळानुसार भाजपचे सर्वाधिक पाच सदस्य जाणार आहेत. युवा स्वाभिमान व काँग्रेसचे प्रत्येकी तीन, तर राष्ट्रवादी व एमआयएमचे प्रत्येकी दोन सदस्य जाऊ शकणार आहेत. इतर पक्षाकडे असलेले संख्याबळ बघता त्यांना स्वबळावर सदस्य पाठवणे अशक्य आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाकडे व बहूजन समाज पक्षाकडे प्रत्येकी तीन सदस्यांचे संख्याबळ आहे. उबाठाकडे दोन व वंचित बहूजन आघाडीकडे एक सदस्य आहे. सोळाव्या सदस्यासाठी पाच सदस्यांचे संख्याबळ आवश्यक आहे. यातील एकाही पक्षाकडे तितके संख्याबळ नसल्याने सोळाव्या सदस्याचा पेच निर्माण झाला होता. दरम्यान, शिवसेनेच्या शिंदे गटाने बहूजन समाज पक्षासोबत हातमिळवणी करीत संयुक्त गट तयार केला आहे. शिवसेना-बसपा, असे नामाकरण करीत या गटाची विभागीय आयुक्तांकडे नोंदणी करण्यात आल्याची माहिती बसपाचे नगरसेवक सचिन वैद्य यांनी दिली. या संयुक्त गटाचे संख्याबळ सहा इतके झाल्याने या गटास एक सदस्य स्थायी समितीमध्ये पाठविता येणार आहे. यामुळे सोळाव्या सदस्यासाठी निर्माण झालेला पेच सुटला आहे. दोन्ही गटातील सदस्यांना स्थायीमध्ये आलटून-पालटून प्रतिनिधित्व देण्यासोबतच विषय समित्यांसाठी तडजोड केल्या जाणार आहे. गटनेतेपदी डॉ. तायडे शिवसेना-बसपा या संयुक्त गटाची अधिकृत नोंदणी करण्यात आली असून गटनेते म्हणून शिंदे सेनेचे डॉ. राजेंद्र तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापुढे या गटातील सहाही सदस्यांना डॉ. तायडे यांचा व्हीप बंधनकारक राहणार आहे. समिती निर्मितीच्या पहिल्या टप्प्यात बसपाचा सदस्य स्थायी समितीत पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## पहिल्या दिवशी ५२६ उमेदवारांची शारीरिक चाचणी

**▸विदर्भ केसरी। अमरावती :**



ग्रामीण पोलिस दलाच्या शिपाई पदाच्या भरतीमध्ये बुधवारी (ता. ११) पहिल्याच दिवशी ५७५ उमेदवारांनी मैदानात हजेरी लावली होती. त्यापैकी ५२६ उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली. ग्रामीण पोलिसांच्या जोग स्टेडियमवर पहाटे साडेपाच ते सहा वाजेपासूनच उमेदवार व त्यांच्या नातेवाइकांनी प्रवेशद्वारावर गर्दी केली होती. परंतु सुरक्षाव्यवस्था चोख असल्याने भरती सुरू होण्यापूर्वीच केवळ उमेदवारांचे ओळखपत्र बघून त्यांना प्रत्यक्ष मैदानावर जाण्याची अनुमती देण्यात आली. पहिल्या टप्प्यामध्ये भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासण्यात आली. त्यानंतर शारीरिक चाचणीला सुरवात केली. ५७५ पैकी ४९ उमेदवार शारीरिक मोजमाप व कागदपत्रे पडताळणीमध्ये अपात्र ठरल्याचे ग्रामीण पोलिस दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. ८०० पैकी २२५ उमेदवार गैरहजर राहिले. कागदपत्रे पडताळणीनंतर शंभर मीटर व १६०० मीटर धावणे, पूलअप, गोळाफेक, उंचउडी, लांबउडीसह इतरही शारीरिक चाचण्या घेण्यात आल्या. जोगस्टेडियम परिसरात पहाटेपासून जवळपास ३०० पोलिस जवान व अधिकाऱ्यांसह आस्थापना विभागातील कर्मचारी पहाटे सहा वाजतापासूनच जोगस्टेडियमवर तैनात होते. ग्रामीण पोलिस दलाच्या २१४ जागांसाठी ही भरतीप्रक्रिया होत आहे. ११ ते २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुरुष, तर २४ ते २६ फेब्रुवारी या कालावधीत महिला उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी व शारीरिक चाचणी घेण्यात येणार आहे.

**■ भरती पारदर्शक पद्धतीने व्हावी, याकरिता सर्वच सकारात्मक प्रयत्न पोलिस दलाकडून केल्या जात आहेत. उमेदवारांनी गैरकृत्य करू नये. भरतीसाठी सहकार्य करावे. -विशाल आनंद पोलिस अधीक्षक, अमरावती.**

# कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

## टेब्रुणसोंडा केंद्रावर बारावी इंग्रजी पेपर फुटला ?

**▸विदर्भ केसरी। प्रेमदास तायडे**



**मेळघाट** चिखलदरा तालुक्यात वर्ग बारावी चे परीक्षा सुरू असून वेगवेगळ्या सेंटरवर हजारो विद्यार्थी परीक्षा देत आहे अशातच शासनाचे शेकडो कर्मचारी परीक्षा सेंटरवर कार्यरत आहेत तालुक्यात व्यवस्थितपणे सुरळीत परीक्षा घेण्यात याव्या, कॉफी मुक्त परीक्षा घ्याव्या, अशा स्पष्ट सूचना शिक्षण विभागा कडून व जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कडून सूचना असतानाही काही केंद्रावर सर्रास कॉपी बहाद्दर पालक व काही एजंट विद्यार्थ्यांना शाळेच्या आसपास असलेल्या झेरॉक्स वरुन प्रश्नपत्रिका चे पीडीएफ चे झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना पूर्वीत आहेत असाच, प्रकार टेब्रूनसोडा येथील एका शाळेवर आढळून आला

या परिसरातील तीन परीक्षा केंद्र असून या केंद्रावरील काही विद्यार्थी बाहेर जिल्ह्यातील व बाहेर गावात तालुक्यातील जिल्ह्यातील उत्तीर्ण होण्याकरिता नावापुरते ऍडमिशन घेत असतात या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याची जबाबदारी परिसरातील संस्था संचालकासह शिक्षक घेत असतात आपल्या शाळेचा रिझल्ट चांगला लागावा त्यासाठी शिक्षकांची धावपळ असते त्यामुळे सर्व प्रकरण मॅनेज करण्यात येते परंतु स्थानिक विद्यार्थ्यांचे या मध्ये मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे स्थानिक विद्यार्थी या परिसरात गरीब कुटुंबातील असून या कॉफीचा फायदा त्या विद्यार्थ्यांना होत नाही,मात्र काही शाळेतील शिक्षक, मॅनेजमेंट, व संस्था अध्यक्ष ,शिक्षक ,हे बाहेर जिल्ह्यातील बाहेर तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून उत्तीर्ण होण्याच्या गॅरंटी घेऊन विद्यार्थ्यांच्या पालकाकडून पंचवीस हजार, वीस हजार अशी ऍडमिशन फी आकारणी घेऊन विद्यार्थी शाळेत न येताच परीक्षेवेळी हजर राहुन त्यांना पास करण्याची गॅरंटी घेण्यात येते. अशा चर्चा सामान्य नागरिक करून ऐकायला मिळाल्या सर्रास हा प्रकार चिखलदरा तालुक्यात दोन-चार केंद्रावर सर्रास सुरू आहे परीक्षा वेळी झेरॉक्स मशीन बंद ठेवण्याच्या आदेश असतानाही काही पोलीस कर्मचाऱ्यांना हाताची धरून शिक्षकांनी प्रश्नपत्रिका केंद्र बाहेर काढून उत्तर पत्रिका मुलांना दिल्याचे दिसून आले याबाबतची माहिती जिल्हा शिक्षण अधिकारी देशमुख मॅडम यांना देण्यात आली होती, इतकेच नव्हे तर पोलीस स्टेशन चिखलदरा यांना सुद्धा देण्यात आली होती यावरून सिद्ध होते की शिक्षण विभागात किती मोठा काळा बाजार सुरू आहे या कॉफी परीक्षा मुळे आदिवासी गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून धन दांडग्या लोकांना मुलांना पास करून धन्यता वाटत आहे हे मात्र खरे आता तरी पुढील पेपर साठी शिक्षण विभाग स्थानिक परीक्षा केंद्रावरील कर्मचारी काफीमुक्त अभियानाला मदत करतील काय? हे पाहणे गरजेचे आहे

**■ स्थानिक नागरिकांनी असे सांगितलेली, शाळेची मॅनेजमेंट संस्था अध्यक्ष यांच्या हात खूप लांब असल्यामुळे कुणीच काही करू शकत नाही, त्या मुळे असे म्हणावे लागेल की,, शिक्षण विभाग कायदा पायदळी तुडवीत आहे आता तरी शिक्षण विभागाने जागरूक व्हावे ओ या केंद्रावर लक्ष द्यावे अशी मागणी सुज्ञ नागरिका कडून होत आहे**

## कार-दुचाकी अपघातात दोघे ठार

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

जिल्ह्यातील वरुड व शिरखेड ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात दोघे ठार झाले आहेत. वरुड तालुक्यातील टेंभूरखेडा व शिरखेडमध्ये या घटना घडल्या. वरुड ठाण्याच्या हद्दीत वरुड ते टेंभूरखेडा सातपुडा बारसमोर पांढऱ्या रंगाच्या एमएच १२ एचव्ही २१४४ क्रमांकाच्या वेगात येणाऱ्या कारने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार वसंत रमेश सिरसाम (वय ३५, रा. मोठी भेमडी, ता. वरुड) गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वरुड पोलिसांनी याप्रकरणी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ज्योती ज्ञानेश्वर वानखडे (वय ३७) या बाजारात फुटाणे विक्रीचे दुकान थाटण्याकरिता गेल्या होत्या. तेवढ्यात त्यांचे पती ज्ञानेश्वर वानखडे (वय ४२) यांना अंकुश देविदास शिरभाते यांच्या दुचाकीने ऑटो थांब्याजवळ जोरदार धडक दिली. अपघातात गंभीर जखमी ज्ञानेश्वर वानखडे यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान ज्ञानेश्वर वानखडे यांचा मृत्यू झाला. ज्योती ज्ञानेश्वर वानखडे यांच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी वाहनचालक अंकुश देविदास शिरभातेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## भीषण आगीत पाणीपुरी विक्रेत्याचे घर जळून खाक

### मूर्तिजापूरमध्ये आगीचे तांडव, लाखोंचे नुकसान

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**



येथील सिरसो रोडवरील केसरी नंदन कॉलनी परिसरात आज बुधवारी सकाळी आगीचे भीषण तांडव पाहायला मिळाले. या आगीत योगेश निंबेकर या गरीब पाणीपुरी विक्रेत्याचे संपूर्ण घर जळून खाक झाले असून, त्यांचे अंदाजे २ ते ३ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही प्राणहानी झाली नाही. योगेश निंबेकर हे आपल्या कुटुंबासह केसरी नंदन कॉलनीतील एका घराच्या वरच्या मजल्यावर राहतात. आज बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास योगेश आपल्या मुलाला शाळेत सोडण्यासाठी गेले होते. साधारण ८:३० ते ९ च्या दरम्यान घराला अचानक आग लागली. योगेश जेव्हा मुलाला शाळेत सोडून परत आले, तेव्हा घरासमोर लोकांची मोठी गर्दी दिसली. आपले घर आगीच्या विळख्यात असल्याचे पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

सर्वस्व आगीत भस्मसात

आग इतकी भीषण होती की घरातील कोणतीही वस्तू वाचवता आली नाही. यामध्ये प्रामुख्याने खालील वस्तूंचे नुकसान झाले आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तू: टीव्ही, फ्रिज, कुलर, संगणक फर्निचर: सोफा, दिवाण, लाकडी कपाट (आलमारी). रोख रक्कम व कागदपत्रे: घरातील महत्त्वाचे कागदपत्रे आणि २५ हजार रुपये रोख रक्कम जळून खाक झाली. याशिवाय घरातील महागडे कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंचा कोळसा झाला आहे.

अग्निशमन दलाची अनुपस्थिती; नागरिकांनी धावून केली मदत

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते, परंतु दुर्दैवाने गाडी वेळेवर पोहोचू शकली नाही. अखेर शेजारील नागरिक आणि आजूबाजूच्या तरुणांनी जीवाची पर्वा न करता पाणी टाकून आग विझवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे आग अधिक पसरण्यापासून वाचली.

**■ प्रशासनाची दखल**

घटनेची माहिती मिळताच तहसीलदारांनी तातडीने पटवाऱ्यांना पंचनाम्यासाठी घटनास्थळी पाठवले. तसेच सिरसो ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक आणि सदस्यांनीही घटनास्थळाची पाहणी करून निंबेकर कुटुंबाला धीर दिला. योगेश निंबेकर हे अत्यंत गरीब असून पाणीपुरीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. या आगीमुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. शासनाने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना तातडीने जास्तीत जास्त आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## चांदुर रेल्वे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर अपंगांचे घेराव आंदोलन

**▸विदर्भ केसरी। चांदुर रेल्वे -**



अपंगाचा जलत गतीने विकास व्हावा यासाठी नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे, धामणगांव रेल्वे या तालुक्यातील अपंगांच्या जीवनावश्यक मागण्यासाठी अपंग जनता दल सामाजिक संघटना जिल्हा अमरावतीच्या वतीने जिल्हाध्यक्ष मा. मयूर मेश्राम यांच्या नेतृवात उपविभागीय कार्यालय चांदूर रेल्वे कार्यालयाला अपंगाकडून घेराव आंदोलन करण्यात आले, संजय गांधी निराधार योजनेचे मानधन दिव्यांगाना अजूनही 1500रु मिळत आहे,त्यांना 2500 रू देण्यात यावे. व नियमित महिन्याच्या 5 तारखेपर्यंत त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे. अंत्योदय योजनेचा लाभ सर्व दिव्यांगाना देण्यात यावा, दिव्यांग प्रमाणपत्र(UDID), दुसऱ्या जिल्ह्यातील असेल तरी त्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात यावा,दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरिता 10*10 ची जागा देण्यात यावी,नगर पंचायत,पंचायत समिती,ग्रामपंचायत कार्यालयाअतर्गत5% दिव्यांग निधी सरसकट सर्व दिव्यांगांना वाटप करण्यात यावा,दिव्यांग बीज भांडवल योजनेच्या कर्ज प्रकरणांना बँकांनी लवकरात लवकर मंजुरी द्यावी. अंथरुणावर पडून असलेल्या दिव्यांगांना आधार कार्ड,व संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात यावा,घरकुल योजनेमध्ये दिव्यांगाना जागा उपलब्ध नसल्यास शासकीय जागा त्यांना उपलब्ध करून देण्यात यावी.दिव्यांगांना ड्रायव्हिंग लायसन्स देण्याकरिता नवीन नियमावली तयार करावी अशा प्रकारच्या मागण्याचे निवेदन अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी यांच्याकडून चांदुर रेल्वे उपविभागीय अधिकारी श्रध्दा उदावंत यांना देण्यात आले व दिव्यांगांच्या मागण्यावर एक तासाचे चर्चासत्र घेत सर्व मागण्यांवर उपविभागीय अधिकारी यांनी दिव्यांगांच्या मागण्या संदर्भात सकारात्मक चर्चा करत काही विषय तत्काळ निकाली काढले,व उर्वरित विषयावर संबंधित विभागाशी चर्चा करून त्यावरही आम्ही उपाययोजना करून आपल्या मागण्या मार्गी लाऊ असे आश्वासन दिले.या आंदोलनाला शेख शकील,राहुल वानखडे, करामत शहा,प्रमोद शेबे,सरोज पुनसे,ज्योती देवकर,भाग्यश्री कुणबीथोप, जोशना खडसे , सुमिता बावनखेडे,सुनीता मोकळे,पूजा बावनखडे,सीमा पसलाने सुलोचना सुलोचना गिरी मनीषा टाक मधुकर राऊत रशीद अहमद प्रतीक्षा मडावी सुरेश लांडे अनिकेत वालेकर शेख शेरू प्रियंका बेबी,डांगे अनुसया वानखडे, पंचफुला चौधरी, नरेंद्र सवाई सचिन पवार केशव फुंडे प्रफुल राऊत रामेश्वर टेंभुरने अरुण देवगिरकर गोपाल साधनकर सुधाकर बनसोड शेख जावेद नुवी परवीन अजय बारबुद्धे मुकिंदा गेडाम रवींद्र नेवारे सुनीता खंडारे वैष्णवी गिरडकर पंचशीला सूर्यवंशी अरविंद घाबरडे निरंजन घोडेश्वर देवानंद गवई शारदा वांदिले इत्यादी दिव्यांग उपस्थित होते.

## अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। परतवाडा**



अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी सविस्तर मागणी आमदार प्रवीण वसंतराव तायडे (अचलपूर विधानसभा मतदारसंघ) यांनी पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सदर निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अचलपूर मतदारसंघाला लागून मेळघाट हा दुर्गम व भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण भाग येतो. तसेच दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी, चांदूर बाजार आदी तालुक्यांतील नागरिकांची विविध शासकीय कामांसाठी मोठ्या प्रमाणावर अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयात ये-जा सुरू असते. अचलपूर शहर व परिसरातील लोकसंख्या सुमारे २ ते ३ लाखांच्या दरम्यान असून महसूल व इतर प्रशासकीय कामकाजाचा ताण लक्षणीय प्रमाणात वाढत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या संबंधित नागरिकांना अमरावती येथे कामानिमित्त जावे लागत असून सुमारे १०० ते १३० किलोमीटर अंतराचा प्रवास करावा लागतो. दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांसाठी हा प्रवास वेळखाऊ व खर्चिक ठरत असून, एका शासकीय कामासाठी दोन ते तीन दिवस खर्ची पडत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांवर आर्थिक व मानसिक ताण निर्माण होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन झाल्यास मेळघाट व परिसरातील नागरिकांना तातडीने व स्थानिक पातळीवर सेवा उपलब्ध होऊ शकतील. तसेच अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावरील कामाचा ताण कमी होऊन प्रशासकीय कार्यक्षमता वाढेल, निर्णयप्रक्रिया जलद होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल, असे आमदार तायडे यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने सदर मागणीचा सकारात्मक व तातडीने विचार करून अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी द्यावी, अशी अपेक्षा आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केली आहे.

## अकोला जिल्ह्यात 'बालविवाह मुक्त भारत' अभियानाचा बिगुल.

### जनजागृती रथाचा दिमाखात शुभारंभ.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



बालविवाहाची अनिष्ट प्रथा मुळापासून उपटून टाकण्यासाठी आणि २०३० पर्यंत देशाला बालविवाह मुक्त करण्यासाठी भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाने '१०० दिवसीय अभियान' हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत अकोला जिल्ह्यात 'बालविवाह मुक्त जनजागृती रथाचा' नुकताच मोठ्या उत्साहात शुभारंभ करण्यात आला. प्रजासत्ताक दिनी दिमाखदार सुरुवात या मोहिमेचा श्रीगणेशा २६ जानेवारी २०२६ रोजी लाल बहादूर शास्त्री स्टेडियम येथे करण्यात आला. जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर आणि जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या प्रमुख उपस्थितीत या रथाचे प्रदर्शन करून मोहिमेला प्रारंभ झाला. त्यानंतर, जिल्हा न्यायालय परिसरात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव आर. एन. बंसल यांच्या हस्ते, तसेच विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रथाला हिरवी झेंडी दाखवण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बी. चंद्रकांत रेड्डी, आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर प्रामुख्याने उपस्थित होते. कायद्याचा बडगा आणि जनजागृती हा रथ अकोला जिल्ह्यातील गावोगावी आणि विशेषतः ज्या भागात बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे, तिथे जाऊन नागरिकांना सतर्क करणार आहे. या मोहिमेद्वारे खालील महत्त्वाचे संदेश दिले जात आहेत.

१८ वर्षांखालील मुलगी आणि २१ वर्षांखालील मुलाचा विवाह करणे हा दंडनीय अपराध आहे. बालविवाह लावून देणारे आई-वडील, नातेवाईक, भटजी (गुरुजी), आचारी, बँड पथक आणि मंडप डेकोरेशनवाल्यांना २ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

कमी वयात लग्न म्हणजे लहान वयात आई होण्याचा धोका, आरोग्याच्या गंभीर समस्या आणि शिक्षणाचा अधिकार हिरावला जाणे होय.

**■ मदतीसाठी आवाहन**

**■ "आपण सर्वांनी मिळून बालविवाह नष्ट करण्यासाठी काम करूया आणि मुलांना त्यांचे हक्क मिळवून देऊया," असे आवाहन प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे यांनी नागरिकांना आवाहन केले की, कुठेही बालविवाह होत असल्याचे आढळल्यास तात्काळ खालील क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल.**

**हेल्पलाईन सेवा संपर्क क्रमांक**
**पोलीस हेल्पलाईन ११२**
**चाईल्ड हेल्पलाईन १०९८ जे.आर.सी. हेल्पलाईन १८००-१०२-७२२२**

**■ हे अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग, बाल संरक्षण कक्ष, 'जस्ट राईट फॉर चिल्ड्रेन' 'इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी' आणि चाईल्ड लाईन अकोला या संस्था अहोरात्र परिश्रम घेत आहेत.**